# विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेची जागृती

**पुणे, दि. ५ -** विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी क्विक हील फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत विविध शाळांमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती सत्रांचे आयोजन करण्यात आले. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी येथील विद्यार्थी हर्षा भांडे आणि सोनम शेख यांनी या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमाद्वारे आतापर्यंत १४ शाळांमध्ये सायबर सुरक्षा सत्रे घेण्यात आली असून इयत्ता ५ वी ते १२ वीपर्यंतच्या २ हजार ८०० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचवण्यात आला आहे. सत्रांमध्ये फिशिंग, बनावट लिंक व वेबसाइट्स, ओटीपी व पासवर्डची सुरक्षितता, सोशल मीडिया सुरक्षा, सायबर बुलिंग, डीपफेक आणि ऑनलाइन गेमिंगमधील धोके यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या प्राचार्या डॉ. अनघा वैद्य व प्रा. मनाली सपकाळ यांचे सहकार्य लाभले.